THE YASH ACADEMY ™

# सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा

## पेपर क्रमांक - 2

**SUBJECTWISE QUESTION SET**

**2015**

**Address :**

**3rd Floor, Moonlight Building, Opp.**

**Sitabuldi Police Station, Sitabuldi Nagpur**

**Mob. 7447777799 / 8381077258 / 07122956053**

# सहायक कक्ष अधिकारी , गट - ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा

## अभ्यासक्रम -SYLLABUS

**पेपर क्रमांक - 1 मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल.**

**मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाकप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे.

**इंग्रजी :-** Common Vocabulary, Sentence structure, Grammer, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage.

**सामान्य ज्ञान:-**

1. **चालू घडामोडी - जागतिक तसेच भारतातील**

2. **माहिती अधिकार अधिनियम - 2005, व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015**

3. **संगणक व माहिती तंत्रज्ञान -** आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळ्या क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलॉजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नवीन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळ्या सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम, जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी. माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न, त्यांचे भवितव्य.

THE YASH ACADEMY TM

**पेपर क्रमांक - 2**

**सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान : या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल.**

1 **बुद्धीमत्ता चाचणी**

2 **महाराष्ट्राचा भूगोल** - महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, हवामान (Climate), पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत, डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती - वने व खनिजे, मानवी व सामजिक भूगोल - लोकसंख्या (Population), Migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्या व त्यांचे प्रश्न

3 **महाराष्ट्राचा इतिहास** - सामाजिक व आर्थिक जागृती (1885 - 1947), महत्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम/भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी.

4 **भारतीय राज्यघटना** - घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्ट्ये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे

-शिक्षण, युनिफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका. राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ - विधानसभा, विधानपरीषद व त्याचे सदस्य, औधकार, कार्य व Role, विधी समीत्या.

5 **राजकीय यंत्रणा (शासनाची रचना अधिकार व कार्ये) केंद्रसरकार केंद्रिय विधिमंडळ आणि राज्यसरकार व प्रशासन (महाराष्ट्राचा विशेष संदर्भ)**

6 **जिल्हा प्रशासन, ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन**

7 **न्यायमंडळ** – न्यायमंडळाची रचना, एकात्मीक न्यायमंडळ - कार्ये, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाची भूमिका व अधिकार,दुय्यम न्यायालये - लोकपाल, लोकायुक्त आणि लोक न्यायालय सांविधानिक आदेशाचे रक्षण करणारे न्यायमंडळ, न्यायालयीन सक्रियता. जनहित याचिका.

8 **नियोजन** – प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा, मुल्यांकन, सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देशफलक, राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण, 73 व 74 वी घटना दुरूस्ती, भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय विकासाचा कल व सेवा क्षेत्राची रूपरेषा, भारतीय अर्थव्यवस्थेच्या समोरील आव्हाने, गरीबी,बेरोजगारी अणि प्रादेशिक असमतोल.

## सहायक कक्ष अधिकारी मुख्य परीक्षा (पेपर – 2)
### PAPER ANALYSIS - SUBJECTWISE

| विषय | वर्ष (2015) |
|---|---|
| चालू घडामोडी व इतर घटक [CURRENT AFFAIRS] | 11 |
| बुद्धीमत्ता चाचणी [REASONING] | 10 |
| भूगोल [GEOGRAPHY] | 06 |
| इतिहास [HISTORY] | 05 |
| भारतीय राज्यघटना [INDIAN POLITY] | 10 |
| माहिती अधिकार अधिनियम - 2005 [RTI ACT -2005] | 05 |
| संगणक व माहिती तंत्रज्ञान [COMPUTER & IT] | 09 |
| राजकीय यंत्रणा [POLITICAL SYSTEM] | 24 |
| जिल्हा प्रशासन, ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन | 15 |
| न्यायमंडळ [JUDICIARY] | 05 |
| नियोजन [PLANNING] | --- |
| | 100 |

## सहायक ( मुख्य ) परीक्षा - २०१५

| | | |
|---|---|---|
| परीक्षा दिनांक : 15 फेब्रुवारी, 2013<br>वेळ : तास | सामान्य अध्ययन - पेपर २ | एकुण प्रश्न : 100<br>एकुण गुण : 100 |

### चालू घडामोडी व इतर घटक

1. 'नायपर'( दि नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्यूटिकल एज्युकेशन अँड रिसर्च ) ची स्थापना ------ येथे होणार आहे.
1 ) पुणे 2 ) मुंबई 3 ) नागपूर 4 ) अमरावती

2. 'उनिकी' हे पुस्तक (विविध लेखांचे संकलन ) कोणत्या राज्यपालांनी लिहिले आहे?
1 ) कल्याण सिंह 2 ) सी. विद्यासागर राव 3 ) राम नाईक 4 ) द्रोनदी मुर्मू

3. युनेस्को इस्टिटयूट फॉर लाईफ लर्निंग (युनेस्को आजीवन शिक्षण संस्था )ची स्थापना ------- येथे करण्यात आली.
1 ) लंडन 2 ) हॅमबर्ग 3 ) पॅरिस 4 ) माद्रिद

4. 'कलवरी' काय आहे?
1 ) युद्धनौका 2 ) पाणबुडी 3 ) सार्क उपग्रह 4 ) दुर्बिण

5. खालील विधाने विचारात घ्याः
अ. 'अटल पेन्शन योजनेत' सहभागी होण्याचे किमान वय 18 आणि कमाल वय 40 वर्ष आहे.
ब. 'प्रधान मंत्री सुरक्षा बिमा योजना' या योजना नैसर्गिक किंवा अपघाती मृत्य झाल्यास रू. 2 लाखाचे विमा संरक्षण केवळ रू.12 च्या वार्षिक हप्त्यात मिळणार आहे.
क. 'प्रधान मंत्री जीवन ज्योती बिमा योजना' या योजनेत नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यू झाल्यास रू. 2 लाखाचे विमा संरक्षण 18-50 वयोगटातील व्यक्तिस रू. 330 च्या वार्षिक हप्त्यात मिळणार आहे.
1 ) विधाने अ आणि ब बरोबर, क चूकीचे. 2 ) विधाने ब आणि क बरोबर, अ चूकीचे.
3 ) विधाने अ आणि क बरोबर, ब चूकीचे. 4 ) सर्व विधाने बरोबर आहेत.

YASH ACADEMY

6. महाराष्ट्राच्या 'आमदार आदर्श ग्राम योजना' बाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?
1 ) तिची घोषणा मंत्रिमंडळाकडून 1 मे 2015 रोजी करण्यात आली.
2 ) गावाची लोकसंख्या किमान एक हजार असणे आवश्यक आहे.
3 ) आमदार स्वतःचे अथवा पत्नीचे गाव दत्तक घेवू शकत नाहीत.
4 ) मुंबईचे आमदार राज्यातील कोणतेही गाव दत्तक घेवू शकतात.

7. जोडया लावा.

| अ. | ब. |
|---|---|
| अ. मायक्रोसॉफ्ट | 1. सुंदर पिचई |
| ब. नोकीया | 2. शंतनू नारायण |
| क. गुगल | 3. सत्या नाडेला |
| ड. अॅडोबे | 4. राजीव सुरी |

1 ) 3 4 1 2 2 ) 3 4 2 1 3 ) 4 3 1 2 4 ) 4 3 2 1

8. 'स्वच्छ भारत अभियानामध्ये'कोणत्या शहराला प्रथम क्रमांक प्राप्त झाला?
1 ) नवी मुंबई 2 ) कोची 3 ) म्हैसूर 4 ) गंगटोक

9. खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही?
1) महाराष्ट्राने अधिकृतरित्या 'ब्लू मॉरमॉन यास राज्य फुलपाखरे म्हणून घोषित केले आहे.
2) याबाबतचा निर्णय हा राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.
3) महाराष्ट्र हे 'राज्य फुलपाखरू असणारे देशातील पहिले राज्य ठरले आहे.
4) ब्लू मॉरमॉन केवळ महाराष्ट्राच्या पश्चिम घाट भागात आढळतो.

---

10. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?
अ. अरविंद सक्सेना यांची केन्द्रीय लोकसेवा आयोगाच्या सदस्यपदी निवड झाली आहे.
ब. केन्द्रीय लोकसेवा आयोगाच्या सदस्यपदी निवड झालेले ते भारतीय गुप्तहेर खात्याचे (RAW) पहिले अधिकारी आहेत.
क. ते उड्डान संशोधन केंन्द्राचे संचालक (Aviation Research Center) म्हणून काम पाहत होते.
1) अ. 2) ब. 3) क 4) वरीलपैकी कोणतेही नाही.

---

11. 'हिमायत' ही विशेष योजना खालीलपैकी कोणासाठी आहे?
1) जम्मू आणि काश्मीरमधील युवक - युवती
2) नक्षलग्रस्त भागातील गरीब कुंटुंबे
3) जम्मू आणि काश्मीरमधील स्त्रिया
4) राजस्थानमधील युवक - युवती

---

## बुद्धीमत्ता चाचणी

12. कोणत्याही गटात सामील होऊ न शकणारा पर्याय निवडा: उत्तर- 4




---

13. समलिंगी विवाहाला मंजूरी देणारा जगातील पहीला देश कोणता?
1) आयर्लंड 2) आईसलँड 3) ईस्त्राएल 4) अमेरिका

---

14. जर + म्हणजे वजाबाकी
- म्हणजे भागाकार
÷ म्हणजे गुणाकार
x म्हणजे बेरीज
(16+4)÷(8-4)x(12+10)= ?
1) 30 2) 40 3) 26 4) 24

---

15. अ ब व क या तिघांपैकी कोणीतरी खात्रीने कुंपणाची भिंत पाडण्याचा गुन्हा केला आहे. चौकशी करणा-यांना यांच्याकडून पुढील उत्तरे मिळाली.
अ. ब ने कुंपण पाडलेले मी पाहिले.
ब. अ ने कुंपण पाडताना मी प्रत्यक्ष पाहिले.

क. ब पहारीने कुंपण फोडताना मी पाहिले.

हे तिघेही कधीही खरे बोलत नसतील तर कुंपण पाडणा-या व्यक्तीचा / व्यक्तींचा निर्देश करणारा पर्याय निवडा.

1) फक्त क 2) अ किंवा ब 3) अ आणि ब मिळून 4) फक्त ब

16. 2001 ते 2011 या दशकात महाराष्ट्रातील कोणत्या जिल्हयात लोकासंख्या वृद्धिचा दर सर्वाधिक आढळतो?

1) मुंबई 2) नाशिक 3) ठाणे 4) नागपूर

17. ठिपक्यांचा विसंगत गट निवडा. उत्तर -1




Select the odd group of dots.

18. पुढील पर्याय कागदाचे तुकडे निर्देशित करतात. यातील कोणते तीन एकमेकात फसवून चौरस निर्माण करता येईल?




1)a,c,d 2)b,c,d 3)a,d,e 4)c,d,e

19. सोबत स्वतःच्या घरापासून ते प्रार्थना सभागृहापर्यंत व्यक्ती चालत गेल्याचा मार्ग दाखवला आहे. त्या ठिकाणी पोहचण्यासाठी ती व्यक्ती उजव्या बाजूला जितक्या वेळा वळली ती संख्या दर्शवणारा पर्याय निवडा.

THE YASH ACADEMY TM



1) 9 2) 2 3) 3 4) 6

20. प्रश्नचिन्हाच्या जागी कोण येईल?

A3Z, E8Y, I18X, --?-----

1) N36Y 2) J38Z 3) M38W 4) M36W

21. M हे B चे वडील आहेत. N ही C ची मुलगी आहे. C ही M ची मुलगी आहे. तर B चे N शी नाते काय?

1) काका किंवा आत्या 2) मामा वा मावशी 3) पुतण्या वा पुतणी 4) भाचा वा भाची

## महाराष्ट्राचा भूगोल

22. खालीलपैकी कोणत्या जिल्हयामध्ये स्थालांतरीत शेती केली जाते?

अ. चंद्रपूर ब. बीड क. भंडारा

ड. जालना इ. ठाणे फ. सोलापूर

1) अ, ब, क 2) ब, क, इ 3) अ, ड, इ, फ 4) अ, क, इ

23. 2011 च्या जनगणनेनुसार चढत्या क्रमाने लोकसंख्येची घनता असणारे जिल्हे कोणते?

1) रायगड, पुणे, नागपूर, ठाणे, मुंबई (उपनगर), मुंबई
2) रायगड, नागपूर, पुणे, ठाणे, मुंबई, मुंबई (उपनगर)
3) रायगड, नागपूर, मुंबई, मुंबई (उपनगर), ठाणे, पुणे
4) मुंबई (उपनगर), मुंबई, पुणे, ठाणे, रायगड, नागपूर

24. सोबत दिलेल्या महाराष्ट्राच्या नकाशात दाखविलेला जिल्हा ओळखाः



1) परभणी 2) हिंगोली 3) अकोला 4) वाशिम

25. हनुमंते घाट हा ---- आणि ---- च्या मध्ये आहे.

1) कोल्हापूर - कुडाळ 2) कोल्हापूर - पणजी 3) कोल्हापूर - रत्नागिरी 4) कोल्हापूर - बेळगाव

26. खालीलपैकी कोणती विधाने असत्य आहेत?

अ. रायगड जिल्हयात 12 तालुके आहेत

ब. पुणे प्रशासकीय विभागात 48 तालुके आहेत

क. कोकण प्रशासकीय विभागात 7 जिल्हे आहेत

ड. इतर प्रशासकीय विभागांच्या तुलनेत औरंगाबाद प्रशासकीय विभागात सर्वांत जास्त जिल्हे आहेत

1) विधान अ आणि ब 2) विधान अ, ब आणि क 3) विधान अ आणि ब 4) विधान ब, क आणि ड

27. खलील विधाने पाहाः

अ. भिमा ही कृष्णेची उपनदी आहे.

ब. इंद्रायणी ही भिमेची उजव्या तीरावरील उपनदी आहे.

क. भोगवती ही सिना नदीची उपनदी आहे

1) विधान अ आणि ब बरोबर आहेत.
2) विधान अ आणि क बरोबर आहे.
3) विधान ब आणि क बरोबर आहे.
4) सर्व विधाने बरोबर आहेत.

## महाराष्ट्राचा इतिहास

28. "मी जरी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही". ही घोषणा कोणी व कोठे केली?

1) वि. रा. शिंदे, कोल्हापूर 2) डॉ. आंबेडकर, येवला 3) डॉ. आंबेडकर, नागपूर 4) महात्मा फुले, पुणे

29. ----- यांना मुंबई शेअर बाजाराचे संस्थापक म्हटले जाते.

1) जमशेटजी टाटा 2) मोरारजी गोकुळदास 3) कासवजी दावर 4) प्रेमचंद रॉयचंद

YASH ACADEMY

30. मुंबई विद्यापिठाची स्थापना ----- समितीच्या अहवालातील शिफारसीमुळे झाली.
1) चार्लस वूड 2) बेनेट कोलमन 3) मेकॉले 4) सॅडलर

31. पुढीलपैकी विजोड संघटना ओळखा:
1) शेअर बाजार 2) कॉटन ब्रोकर्स ॲसोसिएशन 3) बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स 4) मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स

32. पुढीलपैकी कोणती व्यक्ती असे म्हणाली की पुराणे म्हणजे स्वार्थी आणि अज्ञानी लोकांचे लिखाण होय?
1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर 2) महात्मा ज्योतीबा फुले 3) स्वामी विवेकानंद 4) स्वामी दयानंद सरस्वती

## भारतीय राज्यघटना

33. ----- या तारखेपासून भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य आहे असे भारतीय राज्यघटनेने घोषित केले.
1) 13-1-1976 2) 3-1-1977 3) 31-1-1978 4) 1-3-1977

34. भारतीय राज्यघटनेतील परिशिष्टे आणि त्यांचा तपशील यांच्या जोडया जुळवा:

| अ. (भारतीय राज्यघटनेतील परिशिष्टे) | ब. (तपशील) |
|---|---|
| अ. सातवे परिशिष्ट | 1. कार्यालयीन भाषा |
| ब. नववे परिशिष्ट | 2. जमिन सुधारणा कायदा |
| क. आठवे परिशिष्ट | 3. केंद्र आणि राज्यांमध्ये अधिकार वाटप |
| ड. बारावे परिशिष्ट | 4. नगरपालिकांचे अधिकार वाटप |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 3 | 2 | 1 | 4 |
| 2) | 4 | 3 | 2 | 1 |
| 3) | 1 | 3 | 4 | 2 |
| 4) | 2 | 1 | 3 | 4 |

THE YASH ACADEMY TM

35. भारत सरकार कायदा,1935 प्रमाणे स्थापना केलेल्या मुंबई प्रांताच्या विधान परिषदेची पहिली सभा 20 जुलै 1937 रोजी ---- येथे झाली.
1) मुंबई 2) पुणे 3) नागपूर 4) औरंगाबाद

36. मार्गदर्शक तत्वांच्या प्रकरणातील कोणते कलम मादक पेयांच्या सेवनावर बंदी घालण्याशी संबंधित आहे?
1) कलम 41 2) कलम 44 3) कलम 47 4) कलम 38

37. खालीलपैकी कोणत्या राज्यात विधानपरिषद आहे?
1) जम्मू काश्मिर 2) गोवा 3) मणिपूर 4) राजस्थान

38. स्वतंत्र न्यायपालिकेच्या संदर्भात पुढील विधानांपैकी कोणती विधाने चुकीचे आहेत?
अ. न्यायाधिशांची नेमणूक राष्ट्रपती करतात व त्या पदासाठी पात्रता संविधानात नमूद केली आहे.
ब. न्यायाधिशांना पदावरून दूर करण्याची प्रक्रिया कठीण आहे.
क. न्यायाधिशांचे वेतन भारताच्या संचित निधितून दिले जाते.
ड. त्यांच्या वेतनावर कायदेमंडळात मतदान करण्याची तरतूद आहे.
1) अ आणि ब 2) ब आणि क 3) अ अणि क 4) ड

39. सूची-अ व सूची-ब मधील जोडया जुळवा:

| सूची- अ (विधानसभा) | सूची- ब (सदस्य संख्या) |
|---|---|
| अ. आंध्रप्रदेश | 1. 243 |
| ब. अरूणाचल प्रदेश | 2. 126 |
| क. आसाम | 3.294 |
| ड. बिहार | 4. 60 |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 4 | 2 | 3 | 1 |
| 2) | 3 | 4 | 2 | 1 |
| 3) | 4 | 3 | 1 | 2 |
| 4) | 3 | 2 | 4 | 1 |

---

40. सुरूवातीला म्हणजेच जानेवारी 1950 मध्ये भारतीय राज्यघटनेच्या आठ व्या परिशिष्टामध्ये -----भाषा होत्या.
1) 8 2)12 3) 9 4) 14

---

41. 20 मार्च 2015 च्या अधिकृत यादीप्रमाणे महाराष्ट्र विधानपरिषदेतील एकूण 78 सदस्यांची पक्षनिहाय संख्या खालीलप्रमाणे आहेः
------- भारतीय जनता पार्टी
------- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
------- शिवसेना
------- भारतीय राष्ट्रीय काँग्रेस
1) 28, 21, 12, 7 2) 20, 26, 8, 11 3) 12, 28, 7, 21 4) 22, 27, 10, 8

---

42. खालील विधाने विचाारात घ्याः
अ. 1976 च्या 42 व्या घटनादुरूस्तीने नागरिकांची मुलभूत कर्तव्ये राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आली.
ब. 2002 मध्ये 86 व्या घटनादुरूस्तीने मूलभूत कर्तव्यांची संख्या वाढून अकरा झाली आहे.
क. मूलभूत कर्तव्यांची शिफारस संथन्म समितीने केली होती.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?
1) फक्त अ आणि ब 2) फक्त ब आणि क 3) फक्त अ आणि क 4) अ, ब, आणि क

YASH ACADEMY TM

---

## माहिती अधिकार अधिनियम - 2005

43. माहितीचा अधिकार अधिनियम,2005 अन्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल वा कोणत्याही व्यक्तिविरूद्ध दावा, खटला किंवा अन्य कारवाई या कायद्यांच्या ------ कलमा अन्वये दाखल करण्यात येणार नाही.
1) 21 2) 22 3) 23 4) 24

---

44. 2005 च्या माहिती अधिकाराच्या कायद्याची खालीलपैकी कोणती उद्दीष्टे नाहीत?
अ. प्रत्येक लोकसेवकाच्या कार्यामधे पारदर्शकता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करून ती वाढीस लावणे.
ब. लाचलुचपतीस आळा घालणे.
क. नागरिकांना आवश्यक माहिती पुरविण्याबाबत तरतूदी करणे.
ड. विशिष्ट माहितीबाबत गुप्तता पाळणे.
1) क आणि ड 2) ब, क आणि ड 3) ड फक्त 4) सर्व उद्दिष्टे आहेत

---

45. राज्य मुख्य माहिती आयुक्तांची नियुक्ती ----- करतात.

1) राष्ट्रपती 2) पंतप्रधान 3) राज्यपाल 4) मुख्यमंत्री

46. पुढीलपैकी कोणती वाक्ये बरोबर आहेत?
अ. माहितीचा अधिकार अधिनियम जम्मू कश्मिर राज्यात लागू नाही.
ब. सुंपूर्ण अधिनियम लगेच लागू झाला.
1) अ वाक्य बरोबर असून ब चुकीचे आहे. 2) अ वाक्य चुकीचे असून ब बरोबर आहे.
3) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत. 4) दोन्ही वाक्ये चुकीची आहेत.

47. माहिती अधिकाराचा कायद्याअंतर्गत कोणतीही अडचण उद्‌भवली तर ती दूर करण्याचे अधिकार कोणला आहेत?
1) केंद्रीय माहिती आयोग 2) केंद्र सरकार 3) सक्षम अधिकारी 4) भारताचे राष्ट्रपती

## संगणक व माहिती तंत्रज्ञान

48. ------- ही संस्था भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती व तंत्रज्ञान विभाग आणि दळणवळण व माहिती - तंत्रज्ञान मंत्रालयाच्या संयुक्त प्रकल्पातून निर्माण झाली. ही संस्था माहिती व संपर्क (दळणवळण) तंत्रज्ञानाचा शिक्षण, आरोग्यवर्धन या क्षेत्रांचा सर्वसामान्य माणसाला होणा-या विनियोगावर कार्य करते.
1) संपर्क वाहिनी 2) मिडीया एशिया लॅब 3) ज्ञान वाहिनी 4) विद्या वाहीनी

49. इंटरनेटच्या दुरूपयोगाचा धोका मुख्यत्वे कोणापासून असतो?
1) हॅकर्स 2) व्हायरस निर्माते (संगणक विषाणू निर्माते)
3) 1 आणि 2 4) वरीलपैकी एकही नाही

50. इलेक्ट्रॉनिक फॉर्म मध्ये प्रसारित झालेल्या शासकीय वैध गॅझेटला ----- म्हणतात.
1) इलेक्ट्रॉनिक गॅझेट 2) इ - पब्लीश 3) इ- न्यूज 4) गॅझेट - इ डियू

51. खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही?
1) सर्वोच्च न्यायालयाने 24 मार्च, 2015 रोजी सायबर कायद्यातील तरतूद काढून टाकली ज्या तरतूदीमुळे एखाद्या इसमाने खोडसाळपणे अपमानकारक मजकूर वेबसाईटवर टाकल्यास त्याला अटक करण्याचा अधिकार दिलेला होता.
2) सर्वोच्च न्यायालयाने माहिती तंत्रज्ञान कायद्याचे कलम 66A रद्दबादल ठरविले.
3) सर्वोच्च न्यायालयाने असे देखील म्हटले की, 66A ची तरतूद ही स्पष्टपणे भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य या मूलभूत हक्कावर परिणाम करणारी आहे.
4) सर्वोच्च न्यायालयाने माहिती तंत्रज्ञान कायद्याचे कलम 69A आणि 79 या अन्य दोन तरतूदी देखील काढून टाकल्या आहेत.

52. ------ हे एक जगातील अनेक संगणकाला जोडणा-या महाजालामधील शोध साधन आहे, जे Z39.50 या प्रमाणावर आधारित आहे. हे प्रमाण संगणक-संगणकामधील माहिती आदान-प्रदानासाठी लागणा-या नियमांचा संच आहे.
1) व्हेझ (डब्लू.ए.आय.एस्) 2) वॅन (डब्लू.ए.एन) 3) गुगल 4) याहू

53. माहितीच्या शोधासाठी समर्पित असणा-या वेब साईटला काय म्हटले जाते?
1) इन्फॅर्मेशन वेब साईट 2) पर्सनल वेब साईट 3) सर्च इंजिन 4) वरीलपैकी एकही नाही.

54. इंटरनेटचा अनधिकृत वापर या अर्थाने कोणता शब्द प्रयोग केला जातो?
1) हॅकिंग (HACKING) 2) स्पॅम (SPAM) 3) स्पूफींग (SPOOFING) 4) ट्रॅश (TRASH)

55. यु.आर.एल. (URL)या अद्याक्षरातून खालीलपैकी काय ध्वनित होते?

1) यूनिव्हर्सल रीसोर्स लोकेटर 2) यूनिव्हर्सल रेफरन्स लोकेशन 3) यूनिव्हर्सल रीसोर्स लॉजिक 4) यूनायटेड रीलेशन लोकेशन

---

56. जी व्यक्ती एखादा दस्ताऐवज किंवा एखादी इलेक्टॉनिक नोंदणी न्यायालयामध्ये पुरावा म्हणून सादर करता येऊ नये याकरिता तो दस्तऐवज किंवा नोंदणीचा हेतुपुरस्सर नाश करते, त्या व्यक्तिला भारतीय दंड विधानाच्या कोणत्या कलमानुसार शिक्षा होऊ शकते?
1) कलम 175 2) कलम 192 3) कलम 173 4) कलम 204

---

## राजकीय यंत्रणा (शासनाची रचना अधिकार व कार्ये) केंद्रसरकार केंद्रिय विधिमंडळ आणि राज्यसरकार व प्रशासन (महाराष्ट्राचा विशेष संदर्भ)

57. एखाद्या विधेयकावर संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये मतभेद निर्माण झाल्यास दोन्ही सभागृहांचे संयुक्त अधिवेशन भरवून त्यात बहुमताने निर्णय घेतला जातो. तेथे जर समान मत विभागणी झाली तर तो वाद कसा सोडविला जातो?
1) चार आठवडयांच्या कालावधीनंतर ते विधेयक पुन्हा दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीमध्ये मतदानासाठी सादर केला जातो.
2) राज्यसभेचा अध्यक्ष आपल्या निर्णायक मताचा वापर करू शकतो.
3) लोकसभेचा/ च्या सभापती आपल्या निर्णायक मताचा वापर करू शकतात.
4) विधेयक त्या अधिवेशनापुरते स्थगित ठेवून पुन्हा पुढील अधिवेशनात नव्याने विचारार्थ घेतले जाते.

---

58. भारतीय राज्यव्यवस्थेच्या संदर्भात खाली दिलेली कोणती विधाने सत्य आहेत? #
अ. मंत्रिमंडळ संसदेला संयुक्तरित्या जबाबदार असते.
ब. प्रत्येक मंत्री संसदेला वैयक्तिकरीत्या उत्तरदायी नसतो.
क. पंतप्रधानाला आपले सहकारी निवडण्याचे स्वातंत्र्य असते.
ड. अल्पसंख्यांकांसाठी मंत्रिमंडळात राखीव जागा असतात.
पर्यायी उत्तरे :
1) अ, ब आणि क 2) अ आणि क 3) ब आणि ड 4) ब, क आणि ड

---

59. खालील जोडया जुळवाः

| अ. (कलमे) | ब. (तपशिल) |
|---|---|
| अ. कलम - 84 | 1. धनविधेयकाची व्याख्या |
| ब. कलम - 93 | 2. संसदेची संयुक्त बैठक |
| क. कलम - 108 | 3. लोकसभेचा सभापती, उपसभापती |
| ड. कलम - 110 | 4. संसद सदस्यत्वाची पात्रता |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 4 | 3 | 2 | 1 |
| 3) | 3 | 1 | 4 | 2 |
| 4) | 2 | 4 | 1 | 3 |

---

60. भारतीय राज्यघटनेच्या 'सामाईक सूचीत खालीलपैकी कोणता विषय आहे?
1) सामाजिक सुरक्षा व सामाजिक विमा, रोजगार व बेकारी 2) सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता
3) पथकर 4) विमा

---

61. अंदाज समितीबाबत खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?
अ. राज्यसभेचा सदस्य तिच्याशी संबंधित नसतो.
ब. तिच्यात 22 सदस्य असतात.
क. तिचे सदस्य क्रमदेय प्रतिनिधित्व पद्धतीनुसार एका वर्षासाठी निवडले जातात.
ड. सभापती तिच्या सदस्यांमधून एकाची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करतात.

1) अ, ब, क  2) अ, क, ड  3) क, ड  4) अ, क

62. नदीच्या पाण्याशी निगडीत आंतरराज्यीय तंटयाचा निवाडा व्हावा यासाठी योग्य ती तरतूद करण्याचा सांविधानिक अधिकार कोणास आहे?
1) संबंधित राज्यांचे राज्यपाल  2) संसद  3) पंतप्रधान  4) राष्ट्रपती

63. राज्य पुनर्रचना अधिनियम् 1956 नुसार संपूर्ण देशाचे विभाजन खालीलप्रमाणे झाले होतेः
1) 22 राज्ये आणि 9 केंद्रशासित प्रदेश  2) 14 राज्ये अणि 6 केंद्रशासित प्रदेश
3) 17 राज्ये आणि 7 केंद्रशासित प्रदेश  4) 4 प्रकारची राज्ये

64. जोडया लावाः

| | |
|---|---|
| अ. सर्वोच्च न्यायालयाचे व्यावर्तक अधिकारक्षेत्र | 1. प्रधिलेख काढण्याचा अधिकार |
| ब. उच्च न्यायालय | 2. राज्यांचे आपसातील तंटे |
| क. न्यायालयीन सक्रियता | 3. घटनेचे संरक्षण |
| ड. न्यायालयीन पुनर्विलोकन | 4. लोकहितयाचिका |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 1 | 4 | 3 |
| 2) | 3 | 4 | 1 | 2 |
| 3) | 4 | 3 | 2 | 1 |
| 4) | 1 | 4 | 3 | 2 |

65. लोकसभेविषयीची कोणती विधाने सत्य आहेत?
अ. ती संसदबाह्य हस्तक्षेपापासून मुक्त आहे.
ब. केवळ तिलाच केंद्रपातळीवर कायदे करण्याचा सर्वोच्च अधिकार आहे.
क. ती सर्वस्वी सार्वभौम आहे.
ड. ती जनतेला उत्तरदायी आहे.
पर्यायी उत्तरे :
1) अ अणि ब  2) ब, क आणि ड  3) अ, ब आणि क  4) अ अणि ड

THE YASH ACADEMY TM

66. राज्याचा मुख्यमंत्री त्याच्या मंत्रिमंडळातील कोणत्याही सदस्यास वगळू शकतो?
1) त्यास राजीनामा देण्यास सांगून  2) राज्यपालांमार्फत त्यास बडतर्फ करून
3) मंत्रिमंडळाच्या पुनर्रचनेमध्ये त्याला वगळून  4) वरील सर्व पद्धतीने

67. राष्ट्रपतींच्या अधिकारासंदर्भात खालील विधाने विचारात घ्याः
अ. राष्ट्रपती सर्व सैन्य दलांचे सरसेनापती असतात.
ब. राज्यसभेत 12 सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपती स्वेच्छाधीन अधिकारात करतात.
क. राष्ट्रपती संसदेच्या प्रत्येक अधिवेशनाच्या सुरूवातीला दोन्ही सभागृहासमोर अभिभाषण देऊ शकतात.
ड. राष्ट्रपती परदेशात भारताचे प्रतिनिधित्व करतात.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?
1) अ आणि ब  2) ब, क आणि ड  3) अ, क आणि ड  4) अ आणि ड

68. सर्वोच्च न्यायालयाने विविध खटल्यांमध्ये राष्ट्रपतींच्या दयेच्या अधिकाराचे परिक्षण करून काही तत्वे प्रस्तुत केली आहेतः
अ. दया याचना करणा-या अर्जदाराला राष्ट्रपतीद्वारे मौखिक सुनावणी करण्याचा हक्क नाही.
ब. राष्ट्रपती नव्याने पुरावे तपासू शकत नाहीत.
क. राष्ट्रपतीने या अधिकाराचा वापर आपल्या विवेकाधिन अधिकाराने करावा.

ड. राष्ट्रपती आपल्याआदेशाबाबत खुलासा करण्यास बांधील नाहीत.
इ. राष्ट्रपती त्यांना वाटणाऱ्या अनावश्यक कठोर शिक्षेपासून मुक्तता तर देतीलच पण स्पष्ट चुकांपासूनही दोषमुक्त करू शकतील.
वरिलपैकी काणते बरोबर नाहीत.
1) अ, ब, क 2) ब, क 3) फक्त ड 4) ड, इ

69. खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही?
अ. विधान परिषद एकूण सहा महिन्यांच्या कालावधीसाठी सामान्य विधेयकास रोखू शकते किंवा विलंब लावू शकते.
ब. राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीची यंत्रणा राज्यघटनेने दिलेली नाही.
क. जेंव्हा विधान परिषदेमध्ये अस्तित्वात आलेले सामान्य विधेयक विधानसभेकडे पाठविले जाते, ते जर विधानसभेने फेटाळ्ले तर ते विधेयक संपुष्टात येते आणि मृत होते.
पर्यायी उत्तरे :
1) अ 2) ब 3) क 4) यापैकी नाही

70. भारतात खालीलपैकी कोणत्या तरतूदी या संघराज्य पद्धतीच्या विरोधी आहेत?
अ. राज्ये अविनाशी नाहीत.
ब. आणीबाणी तरतूदी
क. अखिल भारतीय सेवा.
ड. राज्यघटनेचे सर्वश्रेष्ठत्व
इ. राष्ट्रपतीद्वारे राज्यांच्या विधेयकावर नकाराधिकार
पर्यायी उत्तरे :
1) अ, ब, क, ड 2) ब, क, ड, इ 3) अ, ब, क, इ 4) ब, क, इ

71. मुंबईचे शेरीफ यांच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही?
1) त्यांच्या पदाचा कालावधी एक वर्षाचा आहे.
2) पदनाम श्रेणीमध्ये त्यांचे स्थान केवळ महापौरांच्या खालोखाल आहे.
3) हे पद भारतामध्ये केवळ मुंबई आणि मद्रास , चेन्नई या शहरासाठीच आहे.
4) स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मुंबईचे पहिले शेरीफ महादेव लक्ष्मण डहाणूकर हे होते.

THE YASH ACADEMY TM

72. भारतीय राज्यघटनेतील 61 वी घटनादुरूस्ती खालीलपैकी कोणत्या बाबींशी संबंधित आहे?
अ. मतदाराची वयोमर्यादा 21 वरून 18 वर्ष करणे.
ब. निवडणूक आयुक्ताची संख्या ठरविणे.
क. निवडणूकीतील गुन्हेगारी प्रवृत्तिंना आळा घालणे.
ड. अनुसुचित जाती व अनुसुचित जमातींसाठी आरंक्षण.
वरीलपैकी कोणते / ती विधाने/ ने बरोबर आहे / त?
1) फक्त अ 2) अ आणि ब 3) अ, ब, आणि क 4) अ, ब आणि ड

73. कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवण्यात खालीलपैकी कोणती संसदीय समिती कळीची भूमिका बजावते?
1) कामकाज सल्लागार समिती 2) नियम समिती 3) लोक-लेखा समिती 4) विशेषाधिकारविषयक समिती

74. खालील विधानांपैकी कोणते चुकीचे आहे?
1) सचिवालय ही सहाय्यकारी संघटना आहे तर खाते ही रेषा संघटना आहे.
2) सचिवालयाचा संबंध धोरण निश्चितीशी आहे तर संचालनालयाचा संबंध धोरणाची कार्यवाही करण्याशी आहे.
3) सचिवालयाने ठरवून दिलेल्या धोरणाला प्रत्यक्ष कृतीमध्ये उतरविण्याचे कर्तव्य संचालनालयाचे असते.
4) महाराष्ट्रात, वन खात्याच्या प्रमुखाचे पदनाम वन संचालक असे आहे.

75. खालील विधाने विचारात घ्या :

अ. राज्यघटनेतील कलम 161 नुसार राज्यपालास देखील दयेचा अधिकार आहे.
ब. राज्यपाल देखील राज्याच्या कायद्याविरोधातील गुन्हेगारास क्षमा करणे, शिक्षेत सूट देणे, कमी करणे, स्थगित करणे इ. प्रकारे दया दाखवू शकतो.
क. राष्ट्रपती आणि राज्यपाल दोघेही कोर्ट मार्शल झालेल्यांना दया दाखवू शकतात.
ड. राष्ट्रपती देहदंडाची शिक्षा माफ करू शकतात मात्र अशा स्वरूपाचा अधिकार राज्यपालाला नाही.
1) विधाने अ, ब, क बरोबर ड चुकीचे. 2) विधाने क, ड, बरोबर अ, ब चुकीचे
3) विधाने अ, ब बरोबर क, ड चुकीचे 4) विधाने अ, ब, ड बरोबर क चुकीचे

76. खालीलपैकी सरकारिया आयोगाची कोणती शिफारस असत्य आहे?
1) ते तीन भाषा सुत्राच्या अंमलबजावणीच्या बाजूचे होते
2) ते अखिल भारतीय सेवा रद्द करण्याच्या बाजूचे होते.
3) त्यांनी राज्यपाल पद रद्द करण्याची मागणी फेटाळली होती
4) ते केंद्राने सामाईक सूचीतील विषयाबाबत कायदा करण्याच्या अगोदर राज्याशी सल्लामसलत करण्याच्या बाजूचे होते.

77. संसद सदस्य अथवा राज्य विधिमंडळ सदस्य राष्ट्रपती म्हणून निवडून येवू शकतो परंतु :
1) निवडणूक लढविण्यापूर्वी त्यास आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागतो.
2) त्याची निवड झाल्यास त्यास तात्काळ आपले पद सोडावे लागते.
3) त्यास निवडीनंतर आपले पद सहा महिन्यांच्या आत सोडावे लागते.
4) संसद सदस्य निवडणूक लढवू शकतो परंतू राज्य विधिमंडळ सदस्य निवडणूक लढवू शकत नाही.

78. राज्यपाल पदाबाबत खालील विधाने विचारात घ्या :
अ. राज्यपालांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून केली जाते.
ब. राज्यपाल पदाचा कार्यकाळ पाच वर्ष आहे परंतू राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत ते पदावर राहतात.
क. राज्यपालांना कार्यकाळाची हमी नाही.
ड. राष्ट्रपतींच्या मर्जीला न्यायालयात आव्हान देता येत नाही.
1) अ आणि ब 2) ब, क आणि ड 3) अ, ब आणि क 4) वरील सर्व

YASH ACADEMY

79. खालील विधाने विचारात घ्या :
अ. तारांकित प्रश्नांची उत्तरे तोंडी स्वरूपात सभागृहाच्या पटलावर दिली जातात.
ब. अतारांकित प्रश्नांचे उत्तर लेखी स्वरूपात दिले जाते.
क. अतारांकित प्रश्नाच्या उत्तरानंतर पुरक अथवा उपप्रश्न विचारात येत नाहीत.
1) अ आणि ब 2) ब आणि क 3) अ आणि क 4) अ, ब, आणि क

80. नियंत्रक आणि महालेखा परिक्षकाच्या घटनात्मक स्थानाचे योग्य वर्णन कोणते?
1) तो कायम कार्यकारी मंडळाचा सदस्य आहे. 2) तो न्यायमंडळाचा सदस्य आहे.
3) तो विधिमंडळाचा सदस्य आहे. 4) तो उपरोल्लेखित कोणत्याही शाखेचा घटक नाही.

## जिल्हा प्रशासन, ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन

81. ग्रामसभेची गणपूर्ती संख्या किती आहे?
1) मतदार यादीतील 15 टक्के मतदार किंवा 100 मतदार यापैकी जी संख्या कमी असेल ती
2) मतदार यादीतील 20 टक्के मतदार किंवा 200 मतदार यापैकी जी संख्या कमी असेल ती
3) मतदार यादीतील 10 टक्के मतदार किंवा 100 मतदार
4) मतदार यादीतील 10 टक्के मतदार किंवा 50 मतदार

82. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अभ्यासासाठी नेमल्या गेलेल्या रॉयल विकेंद्रीकरण आयोगाचे अध्यक्ष कोण हाते?
1) लॉर्ड रिपन 2) लॉर्ड कर्झन 3) लॉर्ड हॉबहाउस 4) लॉर्ड मेयो

83. जनहित याचिका राज्यघटनेच्या पुढील कलमानुसार दाखल करता येते :
1) केवळ 32 2) केवळ 226 3) 32 आणि 226 दोन्ही 4) वरील पैकी नाही

84. महाराष्ट्रात कोणत्या ठिकाणी कटक मंडळे आहेत?
अ. कामठी ब.देवळाली क. सातारा ड. खडकी
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ, ब, क 2) फक्त अ, ब, ड 3) फक्त अ, क, ड 4) फक्त ब, क, ड

85. महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्था ------ पासून अंमलात आली.
1) 1 मे 1960 2) 1 मे 1962 3) 26 जानेवारी 1950 4) 26 नोव्हेंबर 1949

86. नगरपालिका कायद्यानुसार नगर परिषदेचा अर्थसंकल्प ----- च्या आत नगर परिषदेने मंजूर करणे अपेक्षित असते.
1) 31 डिसेंबर 2) 28 फेब्रूवारी 3) 31 मार्च 4) 1 एप्रिल

87. महानगरपालिका सदस्य आपला राजीनामा ----- सादर करतो.
1) महापौरांकडे 2) उप महापौरांकडे 3) स्थायी समिती अध्यक्षांकडे 4) महानगरपालिका आयुक्तांकडे

88. नगर परिषदेची गणपूर्ती संख्या किती आहे?
#
1) 1/10 सदस्य 2) 1/2 सदस्य 3) 1/3 सदस्य 4) 1/4 सदस्य

89. महाराष्ट्रात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कार्ये करणा-या गैर सरकारी संघटना कोणत्या आहेत?
1) अपनालय 2) मशाल 3) युवा 4) लोकसत्ता

90. पंचायत समितीमध्ये महिलांसाठी आरक्षित असलेल्या सभापतीवर निवडून आलेल्या महिला सभापतीच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव मंजूर होण्यासाठी ------ सदस्यांच्या पाठिंब्याची गरज असते.
1) 1/2 2) 1/3 3) 2/3 4) 3/4

91. जिल्हा दंडाधिका-याची कार्ये ----- आहेत.
अ. एस.डी.ओ. किंवा तहसिलदारांच्या महसूली निर्णयां विरूद्धच्या याचिकांची सुनावणी करणे.
ब. शासनाला वार्षिक फौजदारी अहवाल सादर करणे.
क. जिल्हयातील निवडणूक कार्यांवर नियंत्रण व पर्यवेक्षण करणे.
ड. फौजदारी खटल्याच्या याचिकांची सुनावणी करणे.
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ, ब, क 2) फक्त अ, ब, ड 3) फक्त अ, क, ड 4) वरील सर्व

92. योग्य कथन/ कथने ओळखा :
अ. महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचे गठन 1994 मध्ये करण्याात आले.
ब. राज्य वित्त आयोगाचा कार्यकाल 6 वर्ष आहे.
पर्यायी उत्तरे :
1) कथन अ बरोबर, कथन ब चुकीचे 2) कथन अ चुकीचे, कथन ब बरोबर
3) दोन्ही कथने अ आणि ब बरोबर 4) दोन्ही कथने अ आणि ब चुकीची

93. महानगरपालिकेमध्ये जास्तीत जास्त किती सदस्य नामनिर्देशित केले जाऊ शकतात?
1) 3 सदस्य 2) 4 सदस्य 3) 5 सदस्य 4) 6 सदस्य

94. खालीलपैकी महाराष्ट्रातील कोणत्या तालूक्यांमध्ये पंचायत समिती नाही.
अ. नागपूर
ब. अमरावती
क. ठाणे
ड. पुणे
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ, ब, क 2) फक्त अ, ब, ड 3) फक्त अ, क, ड 4) फक्त ब, क, ड

95. जिल्हा परिषद समाज कल्याण समितीमध्ये अनुसूचित जमातीचे कमीतकमी किती सभासद असतात?
1) 2 2) 3 3) 4 4) 5

## न्यायमंडळ

96. विधी सेवा प्राधिकरण कायदा, 1987 अन्वये ----- ला संविधानिक दर्जा प्राप्त झाला आहे.
1) ग्राम न्यायालय 2) खाप पंचायत 3) जलद गती न्यायालय 4) लोक अदालत

97. खालीलपैकी कोणते विवाद सर्वोच्च न्यायालयाच्या मूळ न्यायकक्षेत येत नाहीत?
अ. भारत सरकार आणि कोणतेही राज्य यामधील विवाद
ब. कोणतेही राज्य आणि स्वतंत्र नागरिक यामधील (खाजगी) वाद
क. दोन राज्यांमधील पाणी - तंटयांचा विवाद
ड. दोन किंवा अधिक राज्ये यामधील आपापसातील विवाद
1) अ आणि ड 2) ब आणि क
3) अ, ब, आणि ड 4) सर्व विवाद सर्वोच्च न्यायालयाच्या मूळ न्यायकक्षेत येतात

THE YASH ACADEMY

98. लोकपाल ही संकल्पना सर्वप्रथम स्वीकारणारा देश पुढीलप्रमाणे आहे :
1) युनायटेड किंगडम 2) कॅनडा 3) फ्रान्स 4) स्विडन

99. उच्च न्यायालयाच्या अधिकार कक्षेत खालीलपैकी कोणती बाब येत नाही?
1) मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी आदेश/ परमादेश काढणे. (Issue writ)
2) घटनेतील इतर तरतूदींची पायमल्ली झाल्यास आदेश काढणे. (Issue writ)
3) मूलभूत कर्तव्यांच्या अंमलबजावणीसाठी आदेश काढणे. (writ)
4) खालील कोर्टाने दिलेल्या आदेशाविरूद्धातील अपील दाखल करून निर्णय देणे.

100. कोणाच्या शिफारसी नुसार, भ्रष्टाचार प्रतिबंधात्मक कायदा, 1988 आणि लोकपाल व लोकायुक्त कायदा, 2013 खाली उद्भवणा-या खटल्यांची सुनावणी व निवाडया करता केंद्र सरकार विशेष न्यायालयांची स्थापना करू शकते?
1) राष्ट्रपती 2) पंतप्रधान 3) सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश 4) लोकपाल

## ANS KEY - सहायक (मुख्य) परिक्षा - 2015

| Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 21 | 2 | 41 | 3 | 61 | 2 | 81 | 1 |
| 2. | 2 | 22 | 4 | 42 | 1 | 62 | 2 | 82 | 3 |
| 3. | 2 | 23 | 2 | 43 | 1 | 63 | 2 | 83 | 3 |
| 4. | 2 | 24 | 2 | 44 | 4 | 64 | 1 | 84 | 2 |
| 5. | 3 | 25 | 1 | 45 | 3 | 65 | 4 | 85 | 2 |
| 6 | 1 | 26 | 1 | 46 | 1 | 66 | 4 | 86 | 2 |
| 7 | 1 | 27 | 4 | 47 | 2 | 67 | 4 | 87 | 4 |
| 8 | 3 | 28 | 2 | 48 | 2 | 68 | 2 | 88 | # |
| 9 | 4 | 29 | 4 | 49 | 3 | 69 | 1 | 89 | 1 |
| 10 | 4 | 30 | 1 | 50 | 1 | 70 | 3 | 90 | 4 |
| 11 | 1 | 31 | 3 | 51 | 4 | 71 | 3 | 91 | 1 |
| 12 | 4 | 32 | 4 | 52 | 1 | 72 | 1 | 92 | 1 |
| 13 | 1 | 33 | 2 | 53 | 3 | 73 | 3 | 93 | 3 |
| 14 | 3 | 34 | 1 | 54 | 1 | 74 | 4 | 94 | 3 |
| 15 | 1 | 35 | 2 | 55 | 1 | 75 | 4 | 95 | 1 |
| 16 | 3 | 36 | 3 | 56 | 4 | 76 | 2 | 96 | 4 |
| 17 | 1 | 37 | 1 | 57 | 3 | 77 | 2 | 97 | 2 |
| 18 | 3 | 38 | 4 | 58 | # | 78 | 4 | 98 | 4 |
| 19 | 2 | 39 | 2 | 59 | 2 | 79 | 4 | 99 | 3 |
| 20 | 3 | 40 | 4 | 60 | 1 | 80 | 4 | 100 | 4 |

THE YASH ACADEMY TM